# गुणात्मक बदल केला तरच शैक्षणिक प्रगती : प्राचार्य पाटील

**दोडामार्ग (प्रतिनिधी) :** शिक्षणतज्ज्ञांनी तयार केलेला अभ्यासक्रम व विद्यापिठाची धोरणे प्रभावी राबवली तर आजही शिक्षणातून आनंदनिर्मिती बरोबरच गुणात्मक बदल होणे शक्य आहे. एमआयटी किंवा केंब्रिज सारख्या आंतरराष्ट्रीय विद्यापीठात नोबेल पुरस्कार विजेते शेकडो प्राध्यापक ज्ञानदान करत आहेत. भारतातील एकाही विद्यापीठात असा प्राध्यापक नसल्याची खंत प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांनी व्यक्त केली. येथील लक्ष्मीबाई हळबे महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या नवागतांच्या स्वागत समारंभात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. यावेळी इशा बर्वे, अनिल गावडे, मयुरी गवस आदी विद्यार्थ्यांची स्वागतपर भाषणे झाली. विमल माजीक व सागर गवस, रामकृष्ण परमेकर या नवागत विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील उपक्रमांबद्दल आनंद व्यक्त केला. या प्रसंगी महाविद्यालयाचे नवनियुक्त प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील, प्रा. एम. टी. बेग, प्रा. श्रीपाद पाडगावकर, यांचा सत्कार विद्यार्थ्यांमार्फत करण्यात आला. प्रारंभी दीपप्रज्वलन, सरस्वती पूजन या स्वागतगीताने कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी आयोजित केलेल्या या समारंभाचे प्रास्ताविक प्रा. श्रीपाद पाडगावकर यांनी, सूत्रसंचालन भूषण सावंत यांनी केले. तर उपस्थितांचे आभार वंदना पटकारे हिने मानले.

प्रहार दि. २०।७।१४
कार्यक्रम दि.